# २९) ईश्वर

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

मनुष्य विचारपूर्वक या विशाल सृष्टीकडे पाहतो, अथांग समुद्राकडे पाहतो. विशाल आकाशगंगा अनुभवतो. विविध प्रकारची वनस्पती आणि वृक्ष दृग्गोचर होतात. अनंत सूक्ष्म सृष्टी या विश्वात अस्तित्वात आहे, असे सांगितले जाते. अनंत आकाशगंगा अस्तित्वात आहेत असे बोलले जाते, हे सर्व विश्व जे आपल्याला दिसते ते कोणी निर्माण केले? मी जन्मापूर्वी कुठे होतो, मृत्यूनंतर कोठे असेन? आता माझे येथे असणे कोणाच्या अस्तित्वामुळे आहे? माझ्या येथे असण्याचा हेतू काय आहे? मला या जगात कोणी आणले आहे? सर्व अवयवांनी परिपूर्ण असणारे हे शरीर कसे तयार झाले? या पाठीमागे कोणाची प्रेरणा आहे? असे हे जग आहे तसा मी ही येथे आहे मग माझ्यासहित या विश्वाला निर्माण करणारा कोण? जीव तर ही संपूर्ण सृष्टी निर्माण करू शकत नाही आणि त्यांच्यात तसे सामर्थ्यही नाही. कारण नसताना म्हणजे विनाकारण ही सृष्टी आपोआप निर्माण होऊ शकत नाही. 'Nothing can come from nothing ' ज्या अर्थी ही सृष्टी निर्माण होते त्या अर्थी या सृष्टीला काहीतरी कारण असले पाहिजे आणि ते कारण म्हणजेच देव, ईश्वर. 'This means something must exist, at all times, this is God.' शाळा, शिक्षक, विद्यार्थी, त्यांचे तास जर वेळेवर आणि नियमित होत असतील तर त्या पाठीमागे कोणीतरी चालवणारा असतो, त्याला आपण मुख्याध्यापक म्हणतो. मोठमोठ्या कंपन्या, बँका अनेक वर्षांपासून व्यवस्थित फायद्यात सुरू आहेत, त्या अर्थी त्यांच्या पाठीमागे कोणीतरी महाव्यवस्थापक

असतोच. चित्रकाराशिवाय चित्र नसते. चित्रपट निर्मात्याशिवाय चित्रपट नसतो. थोडक्यात, जर आपल्याला जिथे कुठे निर्मिती दिसत असेल तिथे आपल्याला निर्माता अपरिहार्यपणे मानवाच लागतो. संपूर्ण सृष्टी ही एक निर्मिती (Creation) आहे, तर त्याच्या पाठीमागे निर्माता (Creator) मानावाच लागतो किंवा ही सृष्टी कार्य (effect) आहे, असे मानले तर त्याचे कारण (cause) हे मानावेच लागते. (creation demands creator.) म्हणून या सृष्टीचा निर्माता (creator) किंवा कारण (cause) कोण असेल तर तो ईश्वरच. तुम्ही किंवा मी नक्कीच नसेन. कारण आपण अल्पज्ञ आहोत आणि ईश्वर सर्वज्ञ आहे. निर्मात्याला निर्मितीचे ज्ञान असतेच, म्हणून ईश्वर सर्वज्ञ, सर्व शक्तिमान आणि सर्वव्यापक आहे. त्याच्याच आज्ञेने या सृष्टीतील सर्व घटना घडत असतात.

**तो विश्वश्रियेचा भर्ता। मीचि गा पंडुसुता।**
**मी गोसावी समस्ता। त्रैलोक्याचा।।२८०।।**

**आकाशें सर्वत्र वसावें। वायूनें नावभरी उगें नसावें।**
**पावकें दहावें। वर्षावें जळें।।२८१।।**

**पर्वतीं बैसका न संडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी।**
**पृथ्वीया भूतें वाहावीं। हे आज्ञा माझी।।२८२।।**

**म्या बोलविल्या वेदु बोले। म्यां चालविल्या सूर्यु चाले।**
**म्यां हालविल्या प्राणु हाले। जो जगातें चाळिता।।२८३।।**

**मियांचि नियमिलासांता। काळु ग्रासितसे भूतां।**
**इयें म्हणियागतें पंडुसुता। सकळें जयाचीं।।२८४।।**

**ऐसा जो समर्थु। तो मी जगाचा नाथु।**
**आणि गगनाऐसा साक्षिभूतु। तोहि मीचि।।२८५।।** अ. ९

ईश्वर हा चेतन आहे. सर्व सृष्टी ही एक जड आणि निर्जीव आहे. प्रत्येक वस्तूचा सूक्ष्म भाग म्हणजे अणू किंवा परमाणू तेही जड आहेत. जडाला हालचाल करण्यासाठी स्वतःची शक्ती नसते. जडात जेव्हा हालचाल होते तेव्हा त्याच्या पाठीमागे चेतन तत्त्व मानावे लागते. वेगवान विमानाला, धावणाऱ्या गाडीला कोणीतरी चेतन चालक मानवाच लागतो. तसे या जड सृष्टीला अगदी परमाणूलाही चालना देणारा कोणीतरी चेतन मानावा लागतो. ते चेतन तत्त्व म्हणजे ईश्वर. या संपूर्ण विश्वाचा आधार, आत्मा चेतन देवच आहे. म्हणून या जडसृष्टीला चेतन कारण आहे असे श्री ज्ञानेश्वर महाराज, 'आता विश्वात्मके देवे' या शब्दाने सूचित करतात. Life demands life giver. जीवन आहे तर जीवन देणारा मानावा लागतो. ईश्वर हा दयाळू, कृपाळू, प्रार्थनेला उत्तर देणारा आहे, म्हणून तर अनेक भक्त त्या भगवंताची आराधना, उपासना, भक्ती, पूजा आपल्या वाट्याला आलेल्या कर्माने करत असतात. कर्म ही पूजा आहे. work is worship. कर्म ईश्वराला समर्पित केल्याने ईश्वर प्रसन्न होऊन प्रसाद देतो. याच कारणास्तव श्री संत ज्ञानेश्वर महाराज संपूर्ण ज्ञानेश्वरी हा आपल्या वाणीद्वारे घडलेला वाग्यज्ञ मानतात. तो ईश्वराला समर्पित करतात. ईश्वराने यावर प्रसन्न होऊन प्रसाद द्यावा, अशी विनंतीही करतात. यावरून अंतःकरणपूर्वक केलेली प्रार्थना ऐकून जो प्रतिसाद देतो तो ईश्वर. अशीच भूमिका ईश्वराविषयी श्री ज्ञानेश्वर महाराज मांडतात.

**आता विश्वात्मके देवे। येणे वाग्यज्ञे तोषावे।**
**तोषोनी मज द्यावे। पसायदान हे।।१७९३।।** अ. १८


ईश्वर प्रार्थनेने प्रसन्न होऊन प्रसाद किंवा आशीर्वाद कसा देतो हे पसायदानाच्या शेवटी आपल्याला सहज लक्षात येईल.

**येत म्हणे श्री विश्वेशरावो। हा होईल दान पसावो।**

**येणे वरे ज्ञानदेवो। सुखिया झाला।।१८०१।।** अ. १८

कार्यकारण संबंधानेही ईश्वराचे अस्तित्व मानावे लागते. जर मातीचा घट दिसत असेल तर त्याच्या निर्मितीचे उपादान व निमित्त ही दोन कारणे मानली जातात.

**१) उपादान :** मातीशिवाय घट तयार होत नाही. तयार झालेल्या घटात फक्त मातीच असते, ती माती काढून घेतली तर



घटाला अस्तित्वच राहत नाही म्हणून घटाच्या अस्तित्वाचे मूळ कारण माती आहे म्हणून तिला घटाचे उपादान कारण म्हणतात.

**२) निमित्त कारण :** मातीपासून घट निर्माण करण्यासाठी कोणीतरी चेतन व्यक्ती मानावा लागतो. तो चेतन व्यक्ती म्हणजे कुंभार. तो मातीच्या साहाय्याने आणि आपल्या बुद्धीच्या कौशल्याने अतिशय सुंदर घट तयार करतो, म्हणून कुंभार हा घटाचे निमित्त कारण आहे.

**एऱ्हवीं तरी भूमीआंतूनि स्वयंभ। काय घडेगाडगेयांचे निघती कोंभ।**
**परि ते कुलालमतीचे गर्भ। उमटले कीं।।७४।।**

**नातरी सागरींचां पाणीं। काय तंरगाचिया आहाती खाणी।**
**ते अवांतर करणी। वारयाची नव्हे।।७५।।**

**पाहें पां कापसाचां पोटीं। काय कापडाची होती पेटी।**
**तो वेढितयाचिया दिठी। कापड जाहला।।७६।।**

**जरी सोनें लेणें होऊनि घडे। तरी तयाचें सोनेपण न मोडे।**
**येर अळंकार हे वरचिलीकडे । लेतयाचेनि भावें।।७७।।** अ. ९

समुद्रावर वाऱ्याचा मोठा झोत, लहर आल्याशिवाय लाट तयार होत नाही. विणकराशिवाय कापसापासून कापड तयार होत नाही. सोनाराच्या साहाय्याशिवाय सोन्यापासून अलंकार तयार होत नाही. तशी ही सृष्टी ईश्वराशिवाय तयार होऊ शकत नाही. (स्पायडर) कोळी हा आपल्या शरीरातून एक चिकट द्रव्य बाहेर काढतो आणि त्यापासूनच जाळे विणतो. निर्माण झालेल्या त्या जाळ्याचे निमित्त कारण आणि उपादानकारण तो एक कोळीच आहे. तसा ईश्वर हा सृष्टीचे उपादान कारण आहे, निमित्त कारणही आहे. म्हणजेच सृष्टीचा माता ही तो आहे अन् पिताही तोच आहे.

**पैं जयाचेनि अंगेसंगें। इये प्रकृतीस्तव अष्टांगे।**
**जन्म पाविजत असे जगें। तो पिता मी गा।।२६९।।**

**अर्धनारीनटेश्वरीं। जो पुरुष तोचि नारी।**
**तेविं मी चराचरीं। माताही होय।।२७०।।** अ.९

ईश्वर हा निरपेक्ष कर्मफल दाता आहे.

जसे पेरले तसे उगवते. बाजरीपासून बाजरी, ज्वारीपासून ज्वारी, आंब्यापासून आंबा निर्माण होतो. त्याप्रमाणे जे आपण कर्म करतो त्या कर्माचे फळ कधीतरी आपल्याला भोगावेच लागते. कधी कधी आपण अनेक कर्म करतो त्याचे फळ भेटलेले नसते, ते एकत्रित होऊन साठलेले असते. त्याला अदृष्ट म्हणतात. तो कर्माचाच परिणाम असतो. कर्म हे स्वतः जड आहे. हे कर्म कोणी केले आणि या कर्माचे फळ कोणाला द्यायचे हे कर्माला कळत नाही. परंतु ज्याच्या त्याच्या कर्माचे फळ हे त्याचे त्यालाच भेटले पाहिजे. त्या कर्माचे निरपेक्ष नियोजन करून कर्माप्रमाणे फळ देण्यासाठी कोणीतरी सर्वज्ञ सर्वशक्तिमान आणि सर्व व्यापक तत्त्व मानावे लागते, ते तत्त्व म्हणजेच 'ईश्वर.' जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर.

**तेथ जया जें कर्मसूत्र। मांडूनि ठेविलें स्वतंत्र।**
**तें तिये गती पात्र। होंचि लागे।।१३०९।।** अ. १८

## सूत्रधार ईश्वर :

बाहुल्यांना दोरांच्या साहाय्याने नाचवणारा जसा सूत्रधार असतो त्याप्रमाणे ८४ लक्ष योनींना त्यांच्या कर्माप्रमाणे नाचवणारा सूत्रधार ईश्वर आहे.

**स्वमायेचें आडवस्त्र। लावूनि एकला खेळवी सूत्र।**
**बाहेरी नटी छायाचित्र। चौऱ्याऐंशी लक्ष।।१३०३।।** अ. १८

ईश्वर हा संपूर्ण वेदांचा आणि नीती-नियमांचा निर्माता आहे. ‘Lows Demands a Lawgiver’ संपूर्ण विश्व ‘संकल्पना’ (Design) असेल तर ईश्वर हा ‘संकल्पक’ (Designer) आहे.

Design Demands a Designer.

**ईश्वराचे स्वरूप:**

**१) अस्तित्व हेच ईश्वराचे स्वरूप आहे.**

Existance Is The Nature of God.

अस्तित्व रूप असणारा ईश्वर कोणत्याही रूपाने आणि कितीही रूपाने अभिव्यक्त होतो. जसा अभिनेता एकच असून तो विविध चित्रपटांत विविध भूमिकांतून येतो. तसा ईश्वर कधी राम, कृष्ण, देवी, विठ्ठल, नृसिंह इत्यादी रूपांनी अभिव्यक्त होतो.

**२)** चित्त किंवा ज्ञान हे ईश्वराचे दुसरे रूप आहे. ईश्वर हा नित्य ज्ञानस्वरूप आहे. सर्व जीवांचे आणि त्यांच्या कर्मांचे ज्ञानही ईश्वराला असते. म्हणूनच ईश्वराला सर्वज्ञ असे म्हणतात. सर्व जाणणारा म्हणजे सर्वज्ञ.

**३)** आनंद हेही ईश्वराचे स्वरूप आहे. याच्या आनंदानेच सर्व आनंदी होतात. परंतु याच्या आनंदासाठी कोणत्याही वस्तूची वा व्यक्तीची आवश्यकता नसते. ईश्वर आनंदस्वरूप आहे आणि तो आनंद वस्तूनिरपेक्ष आहे. थोडक्यात, सत् (Existance), चित्त (Conciousness), आणि आनंद (Bliss) हे ईश्वराचे स्वरूप लक्षण आहे. ईश्वराचे कर्म, जन्म, सर्व काही दिव्य असते. तो ईश्वर सज्जनांच्या संरक्षणाकरिता, दुर्जनांच्या नाशाकरिता व धर्माच्या संस्थापनेकरता विविध युगांमध्ये अवतरित होतो.

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्।।७।।** अ. ४

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।**
**धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।८।।** अ. ४

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मतानुसार ईश्वराविषयीची भूमिका खालील ओव्यांच्या द्वारे स्पष्ट होते. भगवंत स्वतः सांगतात, की मी सज्जनांचा कैवार घेण्यासाठी आणि अज्ञानाचा अंधार नाहीसा करण्यासाठी सगुण साकार होतो.

अधर्माची सीमा तोडण्यासाठी, दोषांना धुवून टाकण्यासाठी, सज्जनांच्याद्वारे सुखाची गुढी उभारण्यासाठी मी सगुण साकार होतो.

दैत्यांच्या कुळाचा नाश करण्यासाठी, साधू पुरुषांना पुन्हा सन्मानित करण्यासाठी, धर्म आणि नीतीची सांगड घालण्यासाठी मी सगुण साकार होऊन अवतरित होतो.

विवेकरूपी दिव्यावर अधर्माची आलेली काजळी काढण्यासाठी आणि योग्यांना सुखाची नित्य दिवाळी अनुभवण्यासाठी, पापांचे पर्वत नष्ट करण्यासाठी आणि पुण्याचा उषःकाल येण्यासाठी, सर्व विश्व आत्मसुखाने भरविण्यासाठी, जगात फक्त कर्तव्यरूपी धर्मच नांदविण्यासाठी मी पुन्हा पुन्हा अवतरित होतो, असे ईश्वराचे मनोगत श्री संत ज्ञानेश्वर महाराज विविध ओव्यांच्या द्वारे मांडतात.

**ते वेळी आपुल्याचेनि कैवारें। मी साकारु होऊनि अवतरें।**
**मग अज्ञानाचें आंधारें। गिळूनि घालीं।।५१।।**

**अधर्माचि अवधी तोडीं। दोषांचीं लिहिलीं फाडीं।**
**सज्जनांकरवी गुढी। सुखाची उभवीं।।५२।।**

**दैत्यांचीं कुळें नाशीं। साधूंचा मानु गिंवशीं।**
**धर्मासी नीतीशी। शेंज भरी।।५३।।**

**मी अविवेकाची काजळी। फेडूनी विवेकदीप उजळीं।**
**तैं योगियां पाहे दिवाळी। निरंतर।।५४।।**

**स्वसुखे विश्व कोंदे। धर्मचि जगीं नांदे।**
**भक्तां निघती दोंदें। सात्विकाचीं।।५५।।**

**तैं पापाचा अचळु फिटे। पुण्याची पहाट फुटे।**
**जैं मूर्ति माझी प्रगटे। पंडुकुमरा।।५६।।**

**ऐसेया काजालागी। अवतरें मी युगीं युगीं।**
**परि हेंचि वोळखे जो जगीं। तो विवेकिया।।५७।।** अ. ४

महर्षी पतंजली यांनी, ईश्वर हा सर्व क्लेशांपासून, सर्व कर्मापासून, सर्व कर्मांच्या फळांपासून भिन्न असून सर्वांपासून विशेष आहे. त्याच्या ठिकाणी सर्वज्ञतेचे बीज आहे. जो सर्व गुरूंचाही गुरू आहे. 'ओम्' या नावाने त्याला बोलावले जाते, त्याची आराधना केली जाते. ईश्वर आराधनेमुळे सर्व संकटे, अडथळे प्रतिबंध दूर होतात, असे प्रतिपादन केले आहे.

**क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः।**
**तत्र निरतिशयं सर्वज्ञबीजम्।**

ईश्वराच्या अस्तित्वाविषयी न्यायकुसुमांजलीकार श्री उदयनाचार्यजी यांनी नऊ प्रकारचे युक्तिवाद किंवा हेतू प्रतिपादित केलेले आहेत.

**'कार्याऽऽयोजनधृत्यादेः पदात्प्रत्ययतः श्रुतेः।**
**वाक्यात्संख्याविशेषाच्च साध्यो विश्वविदव्ययः।।'**

या सर्व विश्वाची निर्मिती, उत्पत्ती, स्थिती आणि लय या तिन्ही गोष्टी ज्याच्यामुळे होतात तो ईश्वर.

'God Is Creater, Sustener and Distroyer Of This World.'